
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ



Model Paper

Marathi Medium

English Medium

aglasem.com

प्रथम भाषा : मराठी – इयत्ता : आठवी

इयत्ता : आठवी – विषय : मराठी (लेखी)

विद्यार्थ्याचे नाव : _____ **हजेरी क्रमांक :** ☐

शाळेचे नाव : _____ **तुकडी :** _____

केंद्र : _____ **ता.** _____ **जि.** _____ **दिनांक :** / /

	लेखी									तोंडी		प्राप्त गुण			शिक्षक स्वाक्षरी
प्रश्न क्रमांक	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	मूलभूत क्षमता प्रश्न क्र. १ व १०	इयत्तेच्या क्षमता	एकूण	
प्राप्त गुण															
कमाल गुण	५	५	५	५	५	५	१०	५	५	५	५	१०	५०	६०	

प्र. १. शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) _____ २) _____

३) _____ ४) _____

५) _____ ६) _____

७) _____ ८) _____

९) _____ १०) _____

docs.aglasem.com
aglasem.com

प्र. २. खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

सुनिताचे वडील डॉ. दीपक पंड्या हे जन्माने भारतीय आणि आई बोनी स्लोव्हियन. या दोन्ही संस्कृतींना सुनिताने आपलेसे केले होते. अमेरिकेतील वास्तव्यात आई बोनीनेही हे मिश्र संस्कृतीचे जीवन सुरुवातीपासूनच आपलेसे केले होते. अनेक भारतीय पदार्थ करण्यास बोनी आवडीने शिकल्या होत्या. भारत सोडल्यानंतरही डॉक्टरसाहेबांनी भारतीय संस्कृतीशी नाळ तोडली नव्हती. अगदी छोट्यामोठ्या गोष्टींमधून आपल्या मुलांनाही हा वारसा देण्याचा त्यांचा प्रयत्न असे. या दांपत्याला तीन मुले. जय आणि दीना व सुनिता या कन्या. लहानपणी 'इचक दाना बीचक दाना' हे गाणे डॉक्टरांनी सुनितालाही शिकवले होते. रामायण-महाभारतातल्या कथाही ते मुलांना ऐकवत. वडिलांनी आपली मातृभूमी सोडून इतक्या लांब प्रयाण केले, ही गोष्ट त्या वेळी खूप कठीण होती, याचे सुनिताला आजही अप्रूप वाटते.

सुनिताला लहानपणापासूनच पोहण्याची प्रचंड आवड. एक जलतरणपटू म्हणून ती मोठी होऊ लागली. शाळा भरण्याआधीचा मोकळा वेळ असो, नाहीतर शाळा सुटल्यानंतर सुनिता आपली कायम स्विमिंग टँकवरच असे.

अ) सुनिताची आई आवडीने काय करायला शिकली? (गुण १)

_____

_____

ब) सुनिता कोणत्या दोन संस्कृतीत वाढली? (गुण २)

_____

_____

_____

क) सुनिताचे वडील मुलांसाठी काय काय करीत असत? (गुण २)

_____

_____

docs.aglasem.com

aglasem.com

प्र. ३. खालील कविता मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

अनंता येवढे द्यावे, फुलांचे रंग ना जावे
उडाया पाखरांसाठी, जरा आभाळ ठेवावे ।।१।।

घराला उंबरा राहो, पेटती राहू दे चूल
कुण्याही मायपदराशी खेळते राहू दे मूल ।।२।।

फुलांचा भार ना व्हावा, कधीही कोणत्या देठा
चालत्या पावलांसाठी, असू दे मोकळ्या वाटा ।।३।।

अ) फुलांचा भार कोणाला होऊ नये असे कवीला वाटते? (गुण १)

_____

_____

ब) कवीने कोणासाठी काय काय मागितले आहे? (गुण २)

_____

_____

क) आई व मूल यांच्या दृढ नात्याविषयी कोणती ओळ कवितेत आली आहे ती लिही. (गुण २)

_____

_____

docs.aglasem.com
aglasem.com

प्र. ४. खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

गेल्या ५० वर्षात विज्ञान, तंत्रज्ञान व विकास या दोन गोष्टींमुळे समाजव्यवस्थेत क्रांतिकारक बदल झाला. त्यामुळे अनेक क्षेत्रातील ज्ञानाची क्षितिजे मानवासाठी मोकळी झाली. मानवाची उत्क्रांती, ग्रहताऱ्यांविषयीचे ज्ञान, उपग्रहांवरील संदेशाची देवाण-घेवाण, अणूऊर्जा संशोधन इत्यादींमध्ये आश्चर्यकारक बदल झाले.

या घडामोडीचा 'संगणक' हा एक अविभाज्य घटक आहे. संगणकाची गती, काम करण्याची अचूकता, माहिती साठवून ठेवण्याची क्षमता या अनेक गुणांमुळे संगणक ही एक प्रयोगशाळाच बनली आहे.

तर आपल्याला प्रश्न पडेल की, असा हा बहुगुणी संगणक म्हणजे आहे तरी काय?

याचे उत्तर म्हणजे संगणक हे अतिवेगाने काम करणारे यंत्र आहे. हे यंत्र माणसाने दिलेल्या सूचना अचूकपणे व न थकता पाळत राहते. त्यामुळेच संगणक आजच्या युगात माणसाचा विश्वासू साथी बनला आहे.

अ) आजच्या युगात 'संगणक' हा माणसाचा विश्वासू साथी का बनला आहे? (गुण १)

_____

ब) संगणकाच्या कोणकोणत्या वैशिष्ट्यांचा उल्लेख उताऱ्यात केलेला आहे? (गुण २)

_____

_____

क) मागील पन्नास वर्षांत समाज व्यवस्थेत झालेले बदल कोणते? ते लिही. (गुण २)

_____

_____

_____

docs.aglasem.com
aglasem.com

प्र. ५. खाली लेखाचा भाग दिला आहे तो मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

समाज म्हणून आपण परस्परांना मदत करायची, समाजातील प्रश्न सोडवायचे अशी कितीतरी कामे करू शकतो. साधी गोष्ट घ्या, घनकचरा व्यवस्थापन हा सर्व गावांपासून महानगरांपर्यंतचा प्रमुख प्रश्न झाला आहे. कचरा टाकायला जागा उरल्या नाहीत. शिवाय अशा कचऱ्यामुळे प्रदूषण, रोगराई यांना निमंत्रण मिळते. घनकचऱ्यातील पन्नास टक्के सुका कचरा असतो. सुका कचरा आणि ओला कचरा वेगळा केला तरी पन्नास टक्के प्रश्न कमी होतो. म्हणजे कचरा उचलण्यासाठी लागणारी मनुष्य शक्ती, वाहतुकीसाठी येणारा खर्च आणि त्याची विल्हेवाट लावण्याचा खर्च याच्यात सरळ पन्नास टक्के बचत होते. ओल्या कचऱ्याचे घरच्या घरी किंवा परिसरात खत बनवायचे ठरवले तर तोही प्रश्न राहणार नाही.

मुख्य म्हणजे सुका कचरा हा कितीतरी गरिबांचा, कष्टकऱ्यांचा पोटाचा आधार आहे. ओला-सुका कचरा एकत्र टाकल्यावर त्या कचरा पेटीतून सुके कागद, प्लॅस्टिक, बाटल्या शोधणारी माणसं आपण पाहतो. त्यातून सगळा सुका कचरा वेगळा करता येत नाही. पण त्याचबरोबर त्यांना त्या दुर्गंधीत हात घालावा लागतो. आरोग्याची तर 'ऐशी की तैशी' होते. पण सुका कचरा वेगळा ठेवला आणि तो कचरा गोळा करणाऱ्या कष्टकऱ्यांना दिला तर? त्यांचे केवढे कष्ट कमी होतील. उलट त्यांना फार वणवण न करता कचरा मिळेल. त्यांचे उत्पन्न वाढेल. वास्तविक असे काही करणे म्हणजे त्यांच्यावर उपकार नव्हे. उलट अशा प्रकारे कचरा गोळा करून ते प्रक्रिया उद्योगाला पुरवतात व समाजाची सेवाच करीत असतात. यात आपल्याला सहभागी होता येईल की नाही ?

अ) कचऱ्यामुळे कशाकशाला निमंत्रण मिळते? (गुण १)

_____

ब) आरोग्याची 'ऐशी की तैशी' होणे म्हणजे काय? व ती कशामुळे होते? (गुण २)

_____

_____

_____

क) कचरा व्यवस्थापनात तुला कशा प्रकारे सहभागी होता येईल? (गुण २)

_____

_____

_____

docs.aglasem.com
aglasem.com

प्र. ६. खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.

अ) पुढील प्रसंग वाच व प्रसंगासाठी योग्य असलेला वाक्प्रचार ओळखून लिही. (गुण २)
(तोंडचे पाणी पळणे, तोंडाला पाणी सुटणे, जीवाचे पाणी होणे)

पावसाळ्याचे दिवस होते. आज आईने घरात बटाटेवड्याचा बेत केला होता. मी घरात आलो, घरभर खमंग बटाटेवड्याचा वास येत होता आणि माझ्या _____

_____

ब) पुढील वाक्य वाच, अधोरेखित शब्दांसाठी योग्य शब्दसमूह वापरून वाक्य पुन्हा लिही.
आमच्या शाळेसमोर आंब्याची झाडेच झाडे आहेत. (गुण १)

_____

क) पुढील शब्दाला षष्ठी विभक्तीचा प्रत्यय लावून, त्या शब्दाचा उपयोग करून वाक्य लिही. (गुण २)

१) पुस्तक – _____

२) शाळा – _____

ड) यमक जुळवून पुढील ओळ पूर्ण कर. (गुण २)

जसे : हिरवळ आणि **पाणी**
तेथे स्फूरती मजला **गाणी**

भिरभिर सुटला वारा

_____

docs.aglasem.com
aglasem.com

इ) खालील ओळीतील उपमेय व उपमान ओळख. (गुण १)

जसे – सुरेशचे अक्षर मोत्यांसारखे सुंदर आहे.

उपमेय : अक्षर

उपमान : मोती

तसे – नीलूचे डोळे हरणासारखे आहेत.

उपमेय : _____

उपमान : _____

फ) आईने आणून दिलेली भाजीभाकरी दिनूने खाल्ली.

या वाक्यातील सामासिक शब्द ओळखून लिही व याच प्रकारचा दुसरा सामासिक शब्द लिही. (गुण १)

_____

_____

ग) संधी करा. (गुण १)

जसे – तपः + बल = तपोबल

तसे – मनः + वृत्ती = _____

docs.aglasem.com

aglasem.com

प्र. ७. तुझ्या शाळेत साजरा करण्यात आलेला 'महिला दिन' या कार्यक्रमाचा अहवाल लिही. (गुण ५)

docs.aglasem.com

aglasem.com

प्र. ८. गावामध्ये तंबाखूमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. याबाबत तुझे मत लिही. (गुण ५)

docs.aglasem.com
aglasem.com

प्र. ९. सार्वजनिक पुरवठा होत असलेल्या पाण्याची शुद्धता तपासण्यासाठी स्थानिक शासन संस्थेकडे अर्ज लिही. (गुण ५)

■■■

docs.aglasem.com
aglasem.com